सकाळ

# 'खळनाथ'तर्फे सिनेट सदस्यांचा सत्कार



सांगली : सिनेट सदस्यपदी निवडीबद्दल श्रीनिवास गायकवाड यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. धनाजी कणसे. शेजारी प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर, प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, प्रमोद चौगुले, खळनाथ सोसायटीचे चेअरमन एम. एल. चौगुले, व्ही. के. मायदेव आदी.

**सांगली, ता. २० :** खळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवरील राज्यपाल नियुक्त सदस्यांचा सांगली शाखा कार्यालयात सत्कार करण्यात आला. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजीराव कणसे म्हणाले, ''सिनेट सदस्य हे जबाबदारीचे पद असून नूतन सदस्यांनी विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानून समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत.''

'खळनाथ'चे संस्थापक-अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते.

लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्त समितीचे अध्यक्ष प्रमोद चौगुले, उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सांगली शाखा सल्लागार प्राचार्य आर. जी. कुलकर्णी, प्रभा पाटील, प्रा. डॉ. मेधा आलासे, प्रा. डॉ. सुभाष पाटील, शाखाधिकारी श्रेयस गाडवे यांच्यासह सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

सांगली शाखेचे चेअरमन प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर यांनी स्वागत केले. ज्येष्ठ संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर यांनी प्रास्ताविक केले. सल्लागार प्रा. संजय ठिगळे यांनी सूत्रसंचालन केले. बी. के. मायदेव यांनी आभार मानले.

Sangli, Sangli-Today
21/01/2023 Page No. 2